यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_hsc@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2230718

बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, School Of Multidisciplinary

| | | | |
|---|---|---|---|
| प्रेषक: | मा.डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन,<br>प्र-कुलगुरू तथा संचालक,<br>बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | विषय: | २७, २८ मार्च २०२६ रोजी आयोजित केलेल्या "अध्ययन साहित्य लेखन कार्यशाळे" चा अहवाल सादर करणे बाबत. |
| प्रति: | मा. कुलगुरू | दिनांक: | १३/०४/२०२६ |

मा. महोदय,

बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखे अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार, एम. ए. हिंदू अभ्यास पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम सुरु करण्यात येत आहे. या शिक्षणक्रमांतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमाचे स्वयं अध्ययन साहित्य तयार करण्याकरीता आपल्या अनुमतीनुसार "अध्ययन साहित्य लेखन कार्यशाळे" चे आयोजन २७, २८ मार्च २०२६ रोजी करण्यात आले. या कार्यशाळेचा सविस्तर अहवाल आपणाकडे मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन
प्र-कुलगुरू तथा संचालक
बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा

मा. कुलगुरू यांचे मान्यतेसाठी

मा. कुलगुरू कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: ४CI/१३8
दि. 13/ 4 /२०२6.

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

**बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा**

एम. ए. हिंदू अभ्यास शिक्षणक्रम विकास संदर्भात

**द्वि-दिवासीय "अध्ययन साहित्य लेखन कार्यशाळा"**

# अहवाल

**दि.**२७, २८ मार्च २०२६ **स्थळ :** यश इन सभागृह **वेळ:** १०:३० ते ५:४५

**अनुक्रमणिका**


शीर्षक पृष्ठ

प्रस्तावना

उद्दिष्ट्ये

कार्यशाळेचे वेळापत्रक

सत्राचा सविस्तर आढावा

सहभागींची माहिती

परिशिष्ट

- कार्यक्रम पत्रिका
- उपस्थितांचा आढावा
- छायाचित्रे
- वर्तमानपत्रातील प्रसिद्ध वार्ता
- अभिप्राय फॉर्म
- उपस्थितांची यादी


**प्रस्तावना**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात एम. ए. हिंदू (अभ्यास ) अभ्यास हा शिक्षणक्रम सुरू करण्याचा उपक्रम हा राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि भारतीय ज्ञानपरंपरेचे शास्त्रीय, समकालीन व वैश्विक परिप्रेक्ष्यात पुनर्स्थापन करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मुक्त व दूरस्थ शिक्षण पद्धतीमध्ये अध्ययन साहित्य हे विद्यार्थ्यांच्या स्व-अध्ययनाचे प्रमुख साधन असल्यामुळे त्याची गुणवत्ता, सुस्पष्टता व विद्यार्थीकेंद्रित मांडणी यांना विशेष महत्त्व प्राप्त होते. या पार्श्वभूमीवर अध्ययन साहित्य लेखनाची शास्त्रीय पद्धत, त्याचे प्रारूप, संदर्भांचा अभ्यासपूर्ण वापर तसेच विषयाचे समकालीन सुसंगतीसह सादरीकरण यांविषयी लेखकांना मार्गदर्शन करण्याची गरज प्रकर्षाने जाणवते.

याच उद्देशाने दिनांक २७ व २८ मार्च रोजी लेखकांसाठी "अध्ययन साहित्य लेखन" कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे एम. ए. हिंदू (अभ्यास ) अभ्यास या शिक्षणक्रमाची आधुनिक काळातील आवश्यकता स्पष्ट करणे, जागतिक पातळीवरील हिंदू अभ्यास विषयाचे स्थान अधोरेखित करणे, तसेच अध्ययन साहित्य लेखनाचे प्रारूप, मानके आणि लेखकांची शैक्षणिक जबाबदारी यांविषयी सखोल मार्गदर्शन करणे आहे. त्याचबरोबर भारतीय ज्ञानपरंपरेतील '६४ विद्या' व '१६ विद्या' यांचा परिचय, हिंदू धर्म विमर्श व कर्म विमर्शाची संकल्पना, तसेच सण-उत्सवांची सांस्कृतिक व सामाजिक प्रासंगिकता यांसारख्या विषयांवरही अभ्यासपूर्ण सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत सहभागी झालेला वर्ग हा विषयतज्ज्ञ, अनुभवी लेखक तसेच संशोधक विद्यार्थ्यांचा होता. काही सहभागींची शैक्षणिक पुस्तके प्रकाशित झालेली असून त्यांनी संबंधित विषयात मोलाचे संशोधनकार्य केले आहे, तर काही लेखक हे नवोदित संशोधक म्हणून या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यामुळे कार्यशाळेत अनुभवी व नवोदित अशा दोन्ही स्तरांवरील विचारांची समृद्ध देवाण-घेवाण घडून आली.

सदर कार्यशाळेमुळे लेखकांना अध्ययन साहित्य अधिक प्रभावी, प्रमाणभूत व विद्यार्थ्याभिमुख पद्धतीने तयार

करण्यासाठी आवश्यक अशी दिशा व प्रेरणा मिळाली. प्रस्तुत अहवालामध्ये या दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्दिष्ट, आयोजन, सत्रांचा सविस्तर आढावा, सहभागींचा सहभाग तसेच निष्कर्ष व शिफारसी यांचा सुसंगत आढावा सादर करण्यात येत आहे.

**कार्यशाळेची उद्दिष्टे**

- आधुनिक काळात एम. ए. हिंदू अभ्यास या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक, सांस्कृतिक व वैश्विक महत्त्व लेखकांना समजावून देणे.
- जगभरातील विद्यापीठांमध्ये हिंदू अभ्यास या विषयाचे वाढते महत्त्व व त्याची शैक्षणिक उपयुक्तता अधोरेखित करणे.
- अध्ययन साहित्य रचना, मांडणी, भाषा शैली, अध्यापनाभिमुखता आणि विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोन या विषयीचे लेखनाचे प्रारूप व मानके स्पष्ट करणे
- लेखकांची भूमिका व जबाबदारी निश्चित करणे
- संदर्भ ग्रंथांचे महत्त्व अधोरेखित करणे.
- भारतीय ज्ञानपरंपरेतील ‘६४ विद्या’ व ‘१६ विद्या’ यांचा परिचय करून देणे
- हिंदू धर्म विमर्श व कर्म विमर्श या दोन्ही संकल्पनांचे स्वरूप, तत्त्वज्ञान आणि समकालीन संदर्भातील प्रासंगिकता समजावून देणे.
- हिंदू धर्मातील सण व उत्सवांची प्रासंगिकता अधोरेखित करणे
- गुणवत्तापूर्ण व विद्यार्थ्याभिमुख अध्ययन साहित्य निर्मितीस प्रोत्साहन देणे

## कार्यशाळा पत्रिका

| वेळ | तपशील |
|---|---|
| १०:३० ते १०:३२ | मान्यवरांचे स्वागत |
| १०:३२ ते १०:३५ | वंदेमातरम् |
| १०:३५ ते १०:३७ | विद्यापीठ गीत |
| १०:३७ ते १०:५० | **प्रास्ताविक :** डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन, प्र- कुलगुरू तथा संचालक, बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा |
| १०:५० ते १०:५२ | **स्वागत तथा परिचय :** मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे |
| १०:५२ ते १०:५४ | **स्वागत तथा परिचय :** डॉ. संजीवनी महाले, व्यवस्थापन मंडळ सदस्य |
| १०:५५ ते ११:०० | **मार्गदर्शक :** डॉ. संजीवनी महाले, व्यवस्थापन मंडळ सदस्य |
| ११:०० ते ११:२९ | **उद्बोधन :** मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे |
| ११:२९ ते ११:३० | **ऋणनिर्देश** |

**संयोजक**

डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन,
प्र- कुलगुरू तथा संचालक,
बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा

**कार्यशाळा समन्वयक**

डॉ. मंजुश्री श्री. नेव्हल
शैक्षणिक संयोजक (सहा.प्राध्यापक स्तर)
डॉ. राजेंद्र बगाटे
शैक्षणिक संयोजक (सहा.प्राध्यापक स्तर)

## कार्यशाळेचे वेळापत्र

| वेळ | सत्र | उद्बोधक |
|---|---|---|
| **प्रथम दिवस २७ मार्च २०२६** | | |
| ८:३० ते ९:३० | अल्पोपहार/ नाश्ता | |
| १०:३० ते ११:३० | **उद्घाटन सत्र**<br>**प्रास्ताविक :** डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन<br>प्र-कुलगुरू तथा संचालक, बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | मार्गदर्शक : **डॉ. संजीवनी महाले**, व्यवस्थापन मंडळ सदस्य<br>अध्यक्ष तथा उद्घाटक : **मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे**<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक |
| ११:४५ ते १:०० | हिंदू अभ्यास शिक्षणक्रम : काळाची गरज आणि शैक्षणिक उपयुक्तता | **प्रा. कलापिनी अगस्ती,** प्राध्यापक, भारतीय दर्शन विभाग, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक |
| १:०० ते २:०० | भोजन अवकाश | |
| २:०० ते ३:०० | जागतिक विद्यापीठांतील हिंदू स्टडीज् : ग्रंथ, विचार आणि परिवर्तन | **डॉ. माधवी नरसाळे,**<br>प्राध्यापक, संस्कृत विभाग, मुंबई विद्यापीठ मुंबई |
| ३:०० ते ३:१५ | चहा अवकाश | |
| ३:१५ ते ४:३० | "अध्ययनसामग्री लेखनाचे प्रारूप, आणि जबाबदारी" | **प्रा. संजीवनी महाले,** सदस्य, व्यवस्थापन मंडळ तथा संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, य. च. म. मु. वि. नाशिक |
| ४:३० ते ४:४५ | अवकाश | |
| ४:४५ ते ५:४५ | हिंदू स्टडीज् शिक्षणक्रम: साहित्य व सामर्थ्यमूल्य | **प्रा. पराग जोशी,** संस्कृत भाषा आणि साहित्य विभाग प्रमुख , समन्वयक, IQAC, संचालक, संशोधन, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक |
| ८:०० ते ९:०० | रात्री भोजन | |
| **द्वितीय दिवस २८ मार्च २०२६** | | |
| ८:३० ते ९:३० | **अल्पोपहार/ नाश्ता** | |
| १०:३० ते ११:३० | १८ विद्या व ६४ कला : परिचय–महत्त्व | **प्रा. गौरी माहुलीकर,**शैक्षणिक संचालक, चिन्मय इंटरनॅशनल फाउंडेशन, एर्नाकुलम, केरळ |
| ११:३० ते ११:४५ | चहा अवकाश | |
| ११:४५ ते १:०० | हिंदू सण–उत्सव : वैज्ञानिक दृष्टिकोन | **डॉ. रविकांत सांगुर्डे,**<br>संचालक, सेंटर फॉर हिंदू स्टडीज्, मुंबई विद्यापीठ, मुंबई |
| १:०० ते २:०० | भोजन अवकाश | |
| २:०० ते ३:०० | भारतीय संस्कृतीत हिंदू धर्माचे आणि कर्माचे स्वरूप व प्रासंगिकता - | **डॉ. कला आचार्य,** इमेरिटस प्रोफेसर, क. जे सोमैया धर्म अध्ययन संस्थान, सोमैया विद्याविहार विश्वविद्यालय, मुंबई |
| ३:०० ते ३:१५ | चहा अवकाश | |
| ३:१५ ते ४:३० | लेखक संवाद व अभिप्राय | |
| ४:३० ते ५:१५ | समारोप | |

## सत्राचा सविस्तर आढावा

**प्रस्तावना**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथील बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा यांच्या वतीने अध्ययन साहित्याच्या गुणवत्तावृद्धीसाठी व लेखन कौशल्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने द्विदिवसीय ‘अध्ययन साहित्य लेखन कार्यशाळा’ आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेच्या माध्यमातून विविध विषयातील तज्ज्ञ लेखक, संपादक आणि अभ्यासक यांना एकत्र आणून ज्ञानविनिमयाचे व्यासपीठ निर्माण करण्यात आले.

**कार्यक्रमाचे शीर्षक :**

**द्विदिवसीय ‘अध्ययन साहित्य लेखन कार्यशाळा’**

**आयोजनाचा कालावधी व स्थळ**

- **दिनांक:** २७ व २८ मार्च २०२६
- **स्थळ:** यश इन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ परिसर, नाशिक

**सहभागी व उपस्थिती**

या कार्यशाळेत विविध ठिकाणांहून आलेल्या लेखक, विषयतज्ज्ञ आणि वक्त्यांनी सहभाग नोंदविला. सहभागींची नावे स्वतंत्र सूचीत नमूद करण्यात आलेली असून सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला.

**आयोजनाची वैशिष्ट्ये**

- सहभागींच्या निवास व भोजनाची उत्तम व्यवस्था यश इन येथे करण्यात आली.
- कार्यशाळेतील सर्व सत्रे त्याच ठिकाणी आयोजित करण्यात आली.
- सत्रांचे नियोजन सुबद्धपणे वेळेवर पार पडले.

**कार्यशाळेचा उद्देश**

- अध्ययन साहित्य लेखनाची गुणवत्ता वाढवणे
- लेखकांना लेखनाचे तांत्रिक व शैक्षणिक मार्गदर्शन करणे
- तज्ज्ञांमध्ये विचारांची देवाणघेवाण घडवून आणणे

## उद्घाटन सत्राचा अहवाल :

**सत्राची वेळ व स्थळ**

- दिनांक: २७ मार्च २०२६
- वेळ: सकाळी १०:३० वाजता
- स्थळ: यश इन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रमुख वक्ते**

- प्र-कुलगुरू तथा संचालक डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन सर (प्रास्ताविक)
- व्यवस्थापन मंडळाच्या सदस्या तथा शिक्षणशास्त्र विभागाच्या संचालक डॉ. संजीवनी महाले मॅडम
- माननीय कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सर (उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक)

**विषयाचे मुख्य मुद्दे**

**(अ) प्रास्ताविक –** डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन सर

- कार्यशाळेचे आयोजन माननीय कुलगुरूंच्या मार्गदर्शनातून साकारले.
- विविध विद्वानांना एकत्र आणून सामूहिक चिंतन व विचारमंथन घडविणे हा मुख्य उद्देश.
- बदलत्या परिस्थितीत हिंदू अध्ययनाची आवश्यकता समाजापर्यंत पोहोचविणे गरजेचे.
- देशाच्या वारसा-संपदेचा प्रसार अध्ययन साहित्याद्वारे घराघरांत पोहोचविणे आवश्यक.
- मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणपद्धतीनुसार अध्ययन साहित्याची सुसंगत मांडणी करण्यावर भर.

**(आ) मार्गदर्शक –** डॉ. संजीवनी महाले मॅडम

- अशा प्रकारची कार्यशाळा माननीय कुलगुरूंच्या अनुमतीने प्रथमच आयोजित करण्यात आली.
- हा उपक्रम अध्ययन साहित्य लेखनाच्या दृष्टीने नवोन्मेषी व मार्गदर्शक ठरणारा आहे.

**(इ) उद्घाटनपर भाषण –** माननीय कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सर

- आपण जगत असलेली जीवनपद्धती ही मुळात हिंदू जीवनपद्धतीच आहे.
- बदलत्या जीवनचक्रानुसार जीवनशैलीत परिवर्तन स्वीकारणे आवश्यक**.**
- मोहनजी भागवत यांच्या विचारांतून हिंदू अध्ययनाला दिशा मिळते
- ‘हिंदू स्टडीज’ऐवजी ‘हिंदू अभ्यास’ हा भारतीय शब्दप्रयोग स्वीकारावा.
- हिंदू जीवनपद्धतीत आहार, आरोग्य व विज्ञानाधिष्ठित विचारांचा समन्वय आहे.
- विद्यार्थी विविध स्तरांतून येत असल्याने अध्ययन साहित्य सुलभ, सुबोध व सर्वसमावेशक असावे.
- प्रत्येक वाक्य समाजात भारतीयत्वाविषयी आदर, निष्ठा व स्वाभिमान जागृत करणारे असावे.
- चातुर्मास, ऋतुनुसार आहार-विहार यामध्ये वैज्ञानिक व पर्यावरणपूरक दृष्टिकोन अंतर्भूत आहे.
- भारतीय हिंदू परंपरा समृद्ध व श्रेष्ठ असून तिचा अभिमान जपणे आवश्यक.
- अभ्यासक्रम आधुनिक तंत्रज्ञान व एआयच्या माध्यमातून सर्वांसाठी मुक्त स्वरूपात उपलब्ध.

**निष्कर्ष :**

उद्घाटन सत्र अत्यंत प्रेरणादायी व दिशादर्शक ठरले. या सत्रातून अध्ययन साहित्य लेखनाचे उद्दिष्ट, त्याची सामाजिक व सांस्कृतिक जबाबदारी, तसेच भारतीय ज्ञानपरंपरेचा प्रसार करण्याची गरज अधोरेखित झाली. सर्व वक्त्यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यशाळेच्या पुढील सत्रांसाठी स्पष्ट दिशा निश्चित झाली.

## दुसरे सत्र

**सत्राचे शीर्षक :** हिंदू स्टडीज शिक्षणक्रम : काळाची गरज आणि शैक्षणिक उपयुक्तता

**प्रमुख वक्ता :** डॉ. कलापिनी अगस्ती

या सत्राच्या प्रारंभी डॉ. कलापिनी अगस्ती यांचा परिचय करून देत त्यांचा सत्कार विद्यापीठाची शाल आणि स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला.

**विषयाचे मुख्य मुद्दे**

डॉ. कलापिनी अगस्ती यांनी आपल्या विवेचनात पुढील महत्त्वपूर्ण मुद्दे स्पष्ट केले—

- इतिहास हा केवळ युद्धभूमीवरच नव्हे, तर लेखन व विचार निर्मितीद्वारेही घडविला जातो, त्यामुळे लेखकांची जबाबदारी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.
- अभ्यासक्रम निर्मिती करताना काळाची गरज, समाजाची अपेक्षा आणि विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक आहे.
- हिंदू ही संकल्पना एकसंध धर्म नसूनजीवन जगण्याची व्यापक प्रणाली आहे; तिचा एक संस्थापक, एक ग्रंथ किंवा एक भाषा नाही.
- हिंदू अध्ययन हा आंतरविद्याशाखीय **(**Interdisciplinary) अभ्यास असून त्यात धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृती, साहित्य आणि सामाजिक परंपरांचा समावेश होतो.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार**—**
    - भारतीय ज्ञान प्रणालीचा समावेश आवश्यक (पॅरा4.27, 22.10)
    - समन्वयात्मक शिक्षणावर भर (अध्याय 1)
    - सर्वांगीण शिक्षण (पॅरा4.4)
    - नैतिक मूल्यांचा अभ्यासक्रमात समावेश (पॅरा1.3, 4.4)
- समाजात ‘हिंदू’ आणि ‘हिंदुत्व’ याविषयी गैरसमज आढळतात; ‘हिंदू’ शब्दाची उत्पत्ती ‘सिंधू’ पासून झालेली आहे.
- छत्रपती शिवाजी महाराज यांनी ‘हिंदवी स्वराज्य’ स्थापले, तर विनायक दामोदर सावरकर यांनी हिंदूची व्याख्या स्पष्ट केली.
- हिंदू परंपरेचा गाभा विश्वशांती, मानवतावाद आणि सहअस्तित्व या मूल्यांमध्ये आहे.

- 'धर्म' म्हणजे धारण करणे जे जीवनाला दिशा देणारा तत्त्व आहे.
- हिंदू जीवनपद्धतीतील पुरुषार्थ व आश्रम व्यवस्था हे मूलभूत आधारस्तंभ आहेत.
- अभ्यासक्रमात केवळ हिंदू नव्हे, तर इतर धर्मांचा तुलनात्मक अभ्यास (ख्रिश्चन, मुस्लिम, पर्शियन) समाविष्ट करून व्यापक दृष्टीकोन दिला आहे.
- सत्य, अहिंसा, त्याग, संयम, क्षमा यांसारखी जीवनमूल्ये अध्ययन साहित्याद्वारे अधोरेखित करणे आवश्यक आहे.
- अभ्यासक्रम बहुविद्याशाखीय विषयक (Multidisciplinary) असून त्यात तत्त्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्र, भाषा, साहित्य, आयुर्वेद, योग, स्थापत्यशास्त्र, अनुवादशास्त्र यांचा समावेश आहे.
- 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना समन्वय, सहअस्तित्व आणि एकात्मता यांना प्रोत्साहन देणारी आहे.
- उपनिषदातील **'प्रजायन्तु मा व्यवच्छेत्सी'** या विचारातून कुटुंब व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित होते.
- अभ्यासक्रमाचा उद्देश शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक व आध्यात्मिक विकास घडविणे हा आहे.
- प्राचीनतेचे मूल्य शोधून आधुनिक संदर्भात पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक आहे.
- संशोधनवृत्ती, सर्जनशीलता आणि वास्तववादी दृष्टिकोन विकसित करण्यासाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त आहे.

**चर्चेतून प्राप्त निष्कर्ष**

- हिंदू अध्ययन हा केवळ धार्मिक विषय नसून समग्र जीवनदृष्टी देणारा अभ्यासक्रम आहे.
- अध्ययन साहित्य लेखन करताना भारतीय ज्ञानपरंपरा, नैतिक मूल्ये आणि वैज्ञानिक दृष्टीकोन यांचा समन्वय आवश्यक आहे.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी हिंदू अध्ययन महत्त्वपूर्ण साधनठरते.
- हा अभ्यासक्रम समाजात समन्वय, सहअस्तित्व आणि एकात्मता निर्माण करणारा आहे.
- बहुविषयक दृष्टिकोनामुळे विद्यार्थ्यांमध्ये समग्र विकास आणि वास्तववादी विचारसरणी निर्माण होते.
- संशोधन, सर्जनशीलता आणि भारतीयत्वाविषयी अभिमान जागृत करण्यासाठी हा अभ्यासक्रम कालसुसंगत व उपयुक्त आहे.
- डॉ. प्राची मोघे यांनी खालील मुद्दे प्रकर्षाने लेखनात यावेत यावर भर दिला
    - स्त्री विमर्श- बृहदारण्यक उपनिषद-बीजोद्भवी समदले-अर्धवृगल-2.3 हा मूळ विचार उपस्थापित करणे
    - जागतिक स्थिती- जर्मन स्कूल ऑफ इंडाॅलाॅजी यांचे योगदान
    - सण उत्सव - हिंदु संस्कृतीतील सण,उत्सव हे आताच्या पिढीपर्यंत पोहोचविणे...युगानुकूल साजरे करणे .... आणि डीजे,हिडीस नृत्य यावर बंदी..
- निरज बोधी यांनी खालील मुद्दे प्रकर्षाने लेखनात यावेत यावर भर दिला
    - पाली साहित्यातील संयुक्त निकायातील कोसल संयुत्त 'इत्थी सुत्त' या सुत्तामध्ये भगवान बुद्ध राजा प्रसेनजित यांना मुलगी जन्माला आली असता दु:खी न होण्याचा उपदेश करतात. यात स्त्री महात्म्य वर्णन केलेले आढळते.
    - स्त्रियांना निर्वाण प्राप्त करून विमुक्त सुखाचा अनुभव घेता यावा यासाठी भिक्खुनी संघाची निर्मिती करतात.
    - सामाजिक परिस्थिती प्रतिकूल असताना सुद्धा स्वातंत्र्य बहालकेल्याचे संदर्भ विनयपिटकात आढळतात.

हा सत्र अत्यंत माहितीपूर्ण व दिशादर्शक ठरून अध्ययन साहित्य निर्मितीसाठी आवश्यक असलेली वैचारिक पायाभरणी दृढ करण्यात महत्त्वपूर्ण ठरला.

## तिसरे सत्र

**सत्राचे शीर्षक :** जागतिक विद्यापीठांतील हिंदू स्टडीज : ग्रंथ, विचार आणि परिवर्तन

**प्रमुख वक्ता :** डॉ. माधवी नरसाळे

**विषयाचे मुख्य मुद्दे :**

डॉ. माधवी नरसाळे यांनी आपल्या उद्बोधनात जागतिक पातळीवर हिंदू स्टडीजच्या अभ्यासाची स्थिती, त्यातील बदल आणि भारतीय ज्ञानपरंपरेच्या संदर्भातील महत्त्वपूर्ण पैलूंवर सविस्तर विवेचन केले. त्यांनी पुढील मुद्दे अधोरेखित केले—

- विदेशात हिंदू स्टडीजचा अभ्यास पाश्चात्य दृष्टिकोनातून केला जात असला, तरी मूळ भारतीय ग्रंथांच्या आधारे अध्ययन करणे अत्यंत आवश्यक आहे.
- बोधायन सिद्धांत हा पायथागोरसचा नसून भारतीय परंपरेतून आलेला आहे, हे पाश्चात्यांनी स्वीकारले असले तरी भारतीयांनी त्याचा पुरेसा स्वीकार केलेला नाही; यावरून भारतीय ज्ञानपरंपरेच्या पुनरावलोकनाची गरज अधोरेखित होते.
- युरोपियन, लॅटिन आणि संस्कृत भाषांमधील साम्य स्पष्ट करत त्यांनी भाषिक परंपरांतील परस्परसंबंध दाखवून दिले.
- विदेशात एखाद्या विषयाचा अभ्यास एकदृष्टीने नव्हे, तर बहुदृष्टीकोनातून (multi-perspective approach) केला जातो.
- मनुस्मृतीचे संशोधित स्वरूप समोर आणण्याचे कार्य श्रीलंकेतील पॅट्रिक यांनी केले असल्याचा उल्लेख त्यांनी केला.
- एखाद्या संकल्पनेचा किंवा शब्दाचा अचूक अनुवाद उपलब्ध नसल्यास ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीसारख्या संस्था तो शब्द मूळ स्वरूपात स्वीकारतात**,** ही पद्धत संशोधनासाठी महत्त्वाची आहे.
- विदेशात संशोधनाला प्रोत्साहन व पुरस्कार दिले जातात, त्यामुळे अभ्यासाची सखोलता वाढते.
- हिंदू संस्कृतीबद्दल विदेशात स्नेह व अभ्यासाची सकारात्मक भूमिका दिसून येते, यावर त्यांनी विशेष भर दिला.

**चर्चेतून प्राप्त निष्कर्ष**

या सत्रात व्याख्यानानंतर प्रश्नोत्तर व चर्चेच्या माध्यमातून तज्ज्ञांमध्ये सखोल विचारविनिमय झाला. त्यातून पुढील मुद्दे समोर आले—

- **डॉ. वीणा गानू** यांनी वऱ्हाडपांडे लिखित पुस्तकाच्या अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट केले. आर्य आक्रमण सिद्धांत समजून घेण्यासाठी व त्याचे खंडन करण्यासाठी या पुस्तकाचा अभ्यास आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.
- **डॉ. प्रगती वाघमारे** यांनी डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे – संस्कृत, रिसर्च क्षेत्रातील एक मोठे नाव आहे. ह्यांचा Aryan Invasion A Myth (कपोलकल्पित आर्य आणि त्यांच्या स्वाऱ्या) याचा अभ्यासाकारून अध्ययनात समावेश व्हावा. तसेच इंग्रजी शब्दांची संस्कृत मुलगामिता या त्यांच्या संशोधनाचीही दाखल घ्यावी. डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे- साहित्य, संशोधन आणि पत्रकारिता; प्रकाशन संस्कृत भाषा प्रचारिणी सभा, नागपूर या पुस्तकाचा संदर्भ ग्रंथ म्हणून वापर करावा.
- **डॉ. ललिता नामजोशी** यांनी राजीव लिखित 'विरोधी उद्योगपती आणि भारतीय उद्योगपती' या पुस्तकाचा अभ्यास करून भारतीय व पाश्चात्य उद्योगधारणांमधील भेद समजून घेणे आवश्यक असल्याचे सांगितले.
- **रेणुका पांचाळ** यांनी क्रोनोलॉजी (कालानुक्रमिक परंपरा) स्वीकारण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी स्पष्ट केले की भाषा नेहमी कालानुक्रमिकतेचे पालन करत नाही, मात्र विचारसरणी कालानुक्रमिकतेनुसार विकसित होताना दिसते.
- वेदांच्या अध्ययनात स्कंदस्वामी ते पाश्चात्य पर्यंतच्या अभ्यासाचा विचार केला जातो; मात्र माधव, उदगीथ यांच्या भाष्यांचा अभ्यास दुर्लक्षित राहतो**,** याकडे लक्ष वेधण्यात आले.

**या सर्व चर्चेतून हे स्पष्ट झाले की—**

  - एम ए हिंदू अभ्यास साहित्य मूळ स्रोतांच्या आधारे आणि बहुआयामी दृष्टिकोनातून करणे आवश्यक आहे.

  - o पाश्चात्य संशोधनपद्धतीतील तटस्थता, सखोलता आणि शास्त्रीय दृष्टिकोन आत्मसात करणे गरजेचे आहे.
  - o अनुवाद, ग्रंथसंपादन आणि कालानुक्रमिक विश्लेषण यांना विशेष महत्त्व देणे आवश्यक आहे.

हे सत्र अत्यंत विचारप्रवर्तक ठरले असून जागतिक संदर्भात हिंदू स्टडीजचा अभ्यास करताना भारतीय दृष्टिकोन, मूळ ग्रंथाधारित अध्ययन आणि संशोधनपर दृष्टीकोन यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात यशस्वी ठरले.

**चौथे सत्र:**

**सत्राचे शीर्षक :** अध्ययनसामग्री लेखनाचे प्रारूप आणि जबाबदारी
**प्रमुख वक्त्या :** डॉ. संजीवनी महाले

**विषयाचे मुख्य मुद्दे**

डॉ. संजीवनी महाले यांनी आपल्या सत्रात अध्ययन साहित्य लेखनाची शास्त्रीय पद्धत, त्यातील रचना आणि लेखकांची जबाबदारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी पुढील मुद्दे स्पष्ट केले—

- अध्ययन साहित्य हे दूरस्थ शिक्षण पद्धतीनुसार (Self-learning material) सुलभ, सुबोध आणि विद्यार्थीकेंद्रित असावे.
- लेखन करताना योग्य प्रारूप (format) पाळणे अत्यंत आवश्यक असून त्यात—
  - o शीर्षक व उपशीर्षक यांतील स्पष्ट भेद
  - o सुसंगत आणि प्रवाही भाषाशैली
  - o घटक (units) व उपघटक (sub-units) यांची योग्य रचना यांचा समावेश असावा.
- स्वयंअध्ययन साहित्य विकसित करताना शिक्षणशास्त्रीय दृष्टिकोन अंगीकारणे आवश्यक आहे.
- ब्लूमचे बोधात्मक वर्गीकरण (Bloom's Taxonomy) स्पष्ट करत त्यांनी त्याची श्रेणीबद्ध रचना उदाहरणांसह सांगितली—
  - o ज्ञान (Knowledge)
  - o आकलन (Comprehension)
  - o उपयोजन (Application)
  - o विश्लेषण (Analysis)
  - o संश्लेषण (Synthesis)
  - o मूल्यमापन (Evaluation)

या स्तरांनुसार अध्ययन साहित्याची मांडणी केल्यास विद्यार्थ्यांचा समग्र बौद्धिक विकास साध्य होतो.

**चर्चेतून प्राप्त निष्कर्ष**

या सत्रात झालेल्या चर्चेत डॉ. कलापिनी अगस्ती यांनी पुढील महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले—

- हिंदू अध्ययनाच्या संदर्भात वेधशाळा व संस्कृत अध्ययन क्षेत्रातील कार्यपद्धतींचा अभ्यास करणे आवश्यक आहे.
- प्राचीन हस्तलिखितांचा (Manuscripts) अभ्यास वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांना इंटर्नशिपच्या माध्यमातून प्रेरित करणे गरजेचे आहे.
- ब्लूमच्या वर्गीकरणाचा संदर्भ देताना त्यांनी सांगितले की, यासारखीच संकल्पना सांख्यकारिकेतील 'प्रत्ययसर्ग' मध्ये आढळते. त्यात ज्ञानप्राप्तीच्या पाच पायऱ्या नमूद केल्या आहेत—
  - o **शब्द** – श्रवण करून ज्ञान ग्रहण करणे
  - o **अध्ययन** – वाचन व आकलन करणे
  - o **ऊह** – तर्काच्या आधारे अर्थ लावणे (Interpretation)
  - o **सुहृद प्राप्ती** – परस्पर चर्चेतून ज्ञानाची वृद्धी करणे
  - o **दान** – 'दा' धातूपासून निर्माण झालेला शब्द; ज्ञानाचा प्रसार व उपयोग
- या प्राचीन भारतीय शिक्षणपद्धतीचा स्वीकार करणे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार अत्यंत महत्त्वाचे आहे.

**निष्कर्ष**

हे सत्र अध्ययन साहित्य लेखनासाठी अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक ठरले. यातून पुढील बाबी स्पष्ट झाल्या—

- अध्ययन साहित्य लेखनासाठी शास्त्रीय प्रारूप, सुसंगत रचना आणि विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोन आवश्यक आहे.
- आधुनिक शिक्षणशास्त्र (Bloom's Taxonomy) आणि प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरा यांचा समन्वय साधणे गरजेचे आहे.
- संशोधन, चर्चा आणि अनुभवाधारित शिक्षण यांद्वारे ज्ञानाची सखोलता व उपयुक्तता वाढविता येते**.**

यामुळे हे सत्र अध्ययन साहित्य लेखनातील गुणवत्ता, संरचना आणि शैक्षणिक जबाबदारी यांची जाणीव करून देणारे ठरले.

**पाचवे सत्र :**

**सत्राचे शीर्षक :** हिंदू स्टडीज शिक्षणक्रम : साहित्य व सामर्थ्य मूल्य

**प्रमुख वक्ते :** प्रा. पराग जोशी

**विषयाचे मुख्य मुद्दे**

प्रा. पराग जोशी यांनी आपल्या उद्बोधनात हिंदू स्टडीज शिक्षणक्रमासाठी आवश्यक असणाऱ्या संदर्भ साहित्याची निवड, त्याचे सामर्थ्य मूल्य आणि अध्ययन साहित्य लेखनातील गुणवत्ता या बाबींवर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी पुढील मुद्दे अधोरेखित केले—

- अध्ययन साहित्याची गुणवत्ता टिकविण्यासाठी मूळ संस्कृत ग्रंथांना प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे.
- उपलब्ध हिंदी व मराठी अनुवादित ग्रंथ तसेच भावार्थ ग्रंथांचा उपयोग करता येतो; परंतु ते मूळ ग्रंथाच्या आशयाशी सुसंगत असावेत**,** याची काळजी घेणे आवश्यक आहे.
- अनुवाद करताना मूळ विचार, संदर्भ आणि आशय अबाधित राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे.
- संदर्भ ग्रंथांची निवड करताना ती शिक्षणक्रमाच्या उद्दिष्टांशी सुसंगत असावी.
- अध्ययन साहित्याचे लेखन करताना त्या साहित्याचा उद्देश लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना अपेक्षित वैचारिक स्तरापर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे.
- लिखाण हे उद्दिष्टाधारित (objective-oriented) असावे, यावर त्यांनी विशेष भर दिला.
- भाषांतरित साहित्याचा वापर करताना त्याचे सामर्थ्य मूल्य (strength value) तपासणे आवश्यक आहे.
- विविध विद्यापीठांमध्ये हिंदू स्टडीज अभ्यासक्रमासाठी तयार केलेल्या संदर्भग्रंथांच्या सूचीचा अभ्यास करून त्यानुसार योग्य निवड करणे महत्त्वाचे आहे.
- या संदर्भात त्यांनी पुढील विद्यापीठांचा उल्लेख केला—
    - कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय
    - मुंबई विद्यापीठ
    - इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ
    - काशी संस्कृत विश्वविद्यालय

या विद्यापीठांमध्ये हिंदू स्टडीज अभ्यासक्रम सुरू असून त्यांच्या संदर्भग्रंथ सूचीचा उपयोग लेखकांनी करावा

- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या हिंदू स्टडीज अभ्यासक्रमाच्या आराखड्यानुसार त्यांनी घटकनिहाय संदर्भग्रंथ सूची स्पष्ट केली व त्या प्रत्येक ग्रंथाचे सामर्थ्य मूल्य विशद केले.

**चर्चेतून प्राप्त निष्कर्ष**

- अध्ययन साहित्य लेखनात मूळ ग्रंथाधारितता (authenticity) जपणे अत्यंत आवश्यक आहे.
- अनुवादित साहित्याचा वापर करताना त्याच्या आशयाची अचूकता आणि गुणवत्तेची खात्री करणे गरजेचे आहे.
- शिक्षणक्रमाच्या उद्दिष्टांशी सुसंगत संदर्भग्रंथांची निवड केल्यास अध्ययन साहित्य अधिक प्रभावी व उपयुक्त ठरते.
- विविध विद्यापीठांच्या संदर्भसूचीचा अभ्यास केल्यास मानकीकरण (standardization) आणि गुणवत्ता वाढ साधता येते.
- 'सामर्थ्य मूल्य' या संकल्पनेच्या आधारे ग्रंथांची निवड केल्यास अध्ययन साहित्य सुदृढ, सुसंगत आणि

शैक्षणिकदृष्ट्या सक्षम होते.

**निष्कर्ष**

हे सत्र अध्ययन साहित्य लेखनातील संदर्भग्रंथ निवड, अनुवादाची अचूकता आणि गुणवत्तेची जाणीव निर्माण करणारे ठरले. प्रा. पराग जोशी यांच्या मार्गदर्शनामुळे लेखकांना मूल्याधिष्ठित, उद्दिष्टाधारित आणि प्रमाणित अध्ययन साहित्य निर्मितीची दिशा स्पष्ट झाली.

**दिनांक: २८ मार्च २०२६ कार्यशाळेचा दुसरा दिवस**

वेळ: सकाळी १०:३० ते ११:३०

सत्राचा प्रकार: **ऑनलाइन**

**सत्राचे शीर्षक:** अठरा विद्या आणि ६४ कला : परिचय व महत्त्व

**प्रमुख वक्ते:** प्रा. गौरी माहुलीकर

**मुख्य मुद्दे :**

- अठरा विद्यांचा उल्लेख प्रामुख्याने विष्णुस्मृती, विष्णुपुराण तसेच मौखिक परंपरेमध्ये आढळतो.
- चार वेदांच्या संहितेचे चार भाग — संहिता, ब्राह्मण, आरण्यक आणि उपनिषद — यांचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.
- वेदांशी संबंधित सूत्रग्रंथ (कल्पसूत्र, गृह्यसूत्र, धर्मसूत्र, शुल्बसूत्र) यांतील वैज्ञानिक दृष्टिकोन उत्खननातील पुराव्यांच्या आधारे स्पष्ट केला.
    - उदाहरणार्थ, कर्नाटकातील तंदूर येथे सापडलेले सोमयज्ञाचे अवशेष.
    - शुल्बसूत्रानुसार विविध प्रकारच्या यज्ञवेदींची रचना (त्रिकोणी, समभुज, कूर्मचिती इ.) व त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विटांची संख्या व आकार.
- निरुक्तशास्त्राचे महत्त्व स्पष्ट करताना 'नरक' या शब्दाचे व्युत्पत्तीआधारित विश्लेषण उदाहरणादाखल सांगितले.
- छंदशास्त्र (वेदातील अक्षरवृत्त व साहित्यातील गणवृत्त) आणि ज्योतिषशास्त्राचा गणिताशी असलेला संबंध स्पष्ट केला.
- मीमांसा दर्शन हे संशोधन पद्धती (Indic Research Methodology) म्हणून कसे उपयुक्त आहे व न्यायव्यवस्थेत त्याचा उपयोग कसा करता येतो, यावर मार्गदर्शन केले.
- गांधर्ववेदाचा उल्लेख नाट्यशास्त्रात आढळतो, तर न्यायशास्त्राचे खंडन-मंडनात्मक विचारात महत्त्व अधोरेखित केले.
- अर्थशास्त्राच्या हस्तलिखिताचा शोध व त्यातील राजकीय व्यवस्थेचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.
- कला आणि भाषिक सौंदर्य स्पष्ट करताना 'मोदकैः ताडय' व 'मा उदकैः ताडय' या उदाहरणाद्वारे भाषिक सूक्ष्मता समजावली.
- ६४ कलांची विविध उदाहरणे देऊन त्यांच्या व्यावहारिक आणि कौशल्याधारित उपयोगाचे महत्त्व स्पष्ट केले.

**प्रश्नोत्तर सत्र :**

- डॉ. ललिता नामजोशी यांनी कौशल्याधारित अभ्यासक्रम निर्मितीबाबत प्रेरणा मिळाल्याचे मत व्यक्त केले.
- डॉ. प्रगती वाघमारे यांनी आयुर्वेदाच्या उपवेदत्वाबाबत प्रश्न विचारला. त्यावर वक्त्यांनी स्पष्ट केले की परंपरेनुसार आयुर्वेद हा ऋग्वेदाचा उपवेद मानला जातो, तर अथर्ववेदाला 'भेषज्यवेद' असेही संबोधले जाते.
- 'पंचमवेद' संकल्पनेविषयी विचारले असता, ज्यामध्ये ज्ञान प्रमाणरूपाने व्यक्त होते ते ग्रंथ (उदा. आयुर्वेद, महाभारत) पंचमवेद म्हणून ओळखले जातात, असे सांगितले.
- डॉ. विना गाणु यांनी निर्णय प्रक्रियेबाबत प्रश्न विचारला असता, मीमांसा पद्धतीतील विधी व प्रतिषेध यांचा आधार घेऊन योग्य निर्णय घेण्याचे मार्गदर्शन वक्त्यांनी केले.

**निष्कर्ष :**

या सत्रामधून अठरा विद्या आणि ६४ कलांचा व्यापक व वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्ट झाला. प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेतील

विविध शाखांचे आधुनिक संदर्भात महत्त्व अधोरेखित झाले. तसेच, कौशल्याधारित शिक्षणाची गरज, भाषिक सूक्ष्मता, आणि तत्त्वज्ञानाधारित विचारपद्धती यांचे महत्त्व अधोरेखित करून विद्यार्थ्यांना व अभ्यासकांना नवे दृष्टिकोन प्राप्त झाले.

## दुसरे सत्र

**सत्राचे शीर्षक:** हिंदू सण-उत्सव : वैज्ञानिक दृष्टिकोन

**प्रमुख वक्ते:** डॉ. रविकांत गांगुर्डे

**सत्राचा आढावा :**

या सत्रामध्ये डॉ. रविकांत गांगुर्डे यांनी हिंदू सण-उत्सवांच्या पाठीमागील वैज्ञानिक, आरोग्यविषयक, खगोलशास्त्रीय आणि सांस्कृतिक दृष्टिकोन स्पष्ट केला. भारतीय सण हे केवळ धार्मिक किंवा परंपरागत नसून ते ऋतुचक्र, निसर्ग, खगोलशास्त्र आणि आरोग्य यांच्याशी घट्ट निगडित आहेत, हा मूलभूत विचार त्यांनी मांडला.

**मुख्य मुद्दे :**

- भारतीय सण-उत्सव हे निसर्गाशी सुसंगत असून मानवाच्या शारीरिक व मानसिक आरोग्याशी संबंधित आहेत.
- रामनवमी (चैत्र महिन्यात) या सणाच्या संदर्भात निर्जली उपवास, सुंठवडा यांचा उपयोग शरीराच्या संतुलनासाठी कसा उपयुक्त ठरतो, हे स्पष्ट केले. हा काळ सूर्यतेज वाढण्याचा असल्याने आहार-विहारातील बदल आवश्यक असतात.
- हनुमान जयंती (चैत्र पौर्णिमा) संदर्भात सकाळच्या वेळचे वातावरण, प्राणवायू (ओझोन) यांचे आरोग्यदायी महत्त्व, तसेच शेंदूराचा आयुर्वेदिक उपयोग अधोरेखित केला.
- वटपौर्णिमा या सणातून स्त्रीमध्ये जिद्द, संयम व निसर्गाशी असलेले नाते दृढ होते. वडाच्या झाडातून निघणारा प्राणवायू आरोग्यास उपयुक्त आहे.
- चातुर्मास हा काल मानवामध्ये संयम, सात्त्विकता व मानवी मूल्ये वाढविणारा आहे.
- जगन्नाथ रथयात्रा ही सामाजिक समतेचे प्रतीक असून 'दालमा'सारख्या आहारपद्धतीचा ऋतूनुसार आरोग्यदायी उपयोग स्पष्ट करण्यात आला.

**चर्चा व सूचनात्मक मुद्दे :**

- प्रा. विजय पवार यांनी सण-उत्सवांचे विवेचन करताना आयुर्वेदिक दृष्टिकोनासह शास्त्रीय प्रमाणांचा आधार देणे आवश्यक असल्याचे सांगितले.
- स्थानानुसार निसर्गातील बदल लक्षात घेऊन विविध राज्यांतील सण-परंपरांचा तुलनात्मक अभ्यास करणे महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त झाले.
- ऋतुकाल, आहार-विहार, शोधनकाल, उपवासातील लंघन आणि व्रतवैकल्य यांचा शास्त्रीय अभ्यास करणे आवश्यक असल्यावर भर देण्यात आला.
- डॉ. मृदुला काळे यांनी सणांशी निगडित प्रथा-परंपरांमध्येही विज्ञान दडलेले आहे का, याचा शोध घेणे आवश्यक असल्याचे नमूद केले.
- विनया क्षीरसागर यांनी या सणांचे संदर्भ वेदकालीन साहित्यात आढळतात का, याचे प्रमाणाधारित सादरीकरण अध्ययन साहित्यामध्ये असावे, असे सुचविले.
- प्रज्ञा मोघे यांनी आधुनिक धकाधकीच्या जीवनात सणांचे पालन करताना व्यावहारिक (practical) दृष्टिकोन ठेवण्याची गरज अधोरेखित केली.
- ढिकले सर यांनी सणांचा अभ्यास केवळ आयुर्वेदिक नव्हे, तर खगोलशास्त्रीय, तत्त्वज्ञानात्मक, सामाजिक आणि आर्थिक निकषांवर आधारित असावा, असे सांगितले. सणांमधून आर्थिक संधी कशा निर्माण होऊ शकतात, याचाही विचार आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

**अध्ययन साहित्य निर्मितीसाठी मार्गदर्शन :**

या सत्रातून अध्ययन साहित्य तयार करताना खालील बाबी विशेषतः लक्षात घेणे आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले—

- सण-उत्सवांचे विवेचन बहुआयामी (multidimensional) दृष्टिकोनातून करणे.
- प्रत्येक सणामागील वैज्ञानिक, आयुर्वेदिक, खगोलशास्त्रीय व तत्त्वज्ञानात्मक आधार स्पष्ट करणे.
- प्रमाणाधारित संदर्भ (वेद, शास्त्र, संशोधन) यांचा समावेश करणे.
- आधुनिक जीवनशैली लक्षात घेऊन व्यावहारिक अनुप्रयोग सुचविणे.
- सणांचे स्थानिक व प्रादेशिक विविधता लक्षात घेऊन तुलनात्मक दृष्टिकोन मांडणे.

सणांच्या माध्यमातून आरोग्य, सामाजिक मूल्ये आणि आर्थिक संधी यांचा समन्वय दर्शविणे.

**निष्कर्ष :**

या सत्रामध्ये हिंदू सण-उत्सवांचा सखोल आणि वैज्ञानिक दृष्टिकोन उलगडून दाखविण्यात आला. सण हे केवळ आनंदाचे किंवा परंपरेचे प्रतीक नसून ते आरोग्य, निसर्ग, समाज आणि अर्थव्यवस्था यांच्याशी निगडित असलेली एक समग्र जीवनपद्धती आहे, हा विचार प्रभावीपणे मांडण्यात आला. अध्ययन साहित्य निर्मितीसाठी हे सत्र अत्यंत दिशादर्शक ठरले.

**तिसरे सत्र**

**सत्राचे शीर्षक:** भारतीय संस्कृतीत हिंदू धर्म आणि कर्माचे स्वरूप व प्रासंगिकता

**प्रमुख वक्ते:** डॉ. कला आचार्य

**सत्राचा आढावा :**

या सत्रामध्ये डॉ. कला आचार्य यांनी भारतीय संस्कृतीतील हिंदू धर्माची संकल्पना, त्याचे तात्त्विक अधिष्ठान आणि कर्माच्या स्वरूपाची प्रासंगिकता यांचा सखोल ऊहापोह केला. हिंदू धर्म हा वेदप्रमाणावर आधारित असून, तो केवळ श्रद्धा नव्हे तर आचार, विचार आणि कृती (कर्म) यांचा समन्वय साधणारी जीवनपद्धती आहे, हा मूलभूत विचार त्यांनी मांडला.

**मुख्य मुद्दे :**

- हिंदू धर्माचा पाया वेदप्रमाणावर आधारित असून, आचारव्यवस्था आणि धर्मपालन यांना विशेष महत्त्व आहे.
- **'**धारणात् धर्मः**'** या संकल्पनेनुसार मूल्यांचे पालन आणि जीवनातील सदाचार हेच धर्माचे मूळ आहे.
- "यज्ञेन यज्ञमयजन्त देवाः" या विचारानुसार धर्म हा क्रियाशीलतेवर (यज्ञभावना) आधारित आहे.
- यज्ञ, सात्त्विक वाणी आणि धर्ममीमांसेवर आधारित ज्ञान यांचा समन्वय धर्माच्या व्यापक आयामात समाविष्ट होतो.
- छांदोग्य उपनिषदातील 'तप' संकल्पना — स्वधर्माचे सातत्याने, परिश्रमपूर्वक पालन करणे म्हणजे तप — विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे.
- दान ही धर्माची महत्त्वपूर्ण संकल्पना असून, तिच्या योग्य आकलनातून कर्तव्यपालनाची जाणीव दृढ होते.
- 'निधन' या संकल्पनेचा अर्थ केवळ मृत्यू नसून, कर्तव्यापासून दूर राहणे असा व्यापक अर्थही समजावून सांगितला.
- कर्माचे फळ हे कालानुरूप मिळते, हा विचार स्पष्ट करताना वर्तमानकाळातील कर्मप्रवृत्तीचे महत्त्व अधोरेखित केले.
- सत्य या मूल्याचे स्पष्टीकरण करताना, वक्त्याचे कथन श्रोत्यांनी तद्रूपतेने ग्रहण करणे हेही सत्यधर्माचे अंग असल्याचे नमूद केले.
- 'पवित्रता' ही संकल्पना स्पष्ट करताना, अर्थार्जनासाठी योग्य व नैतिक मार्गांचा अवलंब करणे हेच खरे पवित्र आचरण असल्याचे सांगितले.

**अध्ययन साहित्य निर्मितीसाठी मार्गदर्शन :**

- हिंदू धर्म आणि कर्म यांचे विवेचन करताना सोप्या, स्पष्ट आणि उदाहरणाधारित पद्धतीचा अवलंब करावा.
- विद्यार्थ्यांना संकल्पना समजण्यासाठी कथा, प्रसंग आणि दृष्टांतांचा वापर करणे उपयुक्त ठरते.
- धर्म, तप, दान, सत्य, पवित्रता यांसारख्या संकल्पनांचे व्यावहारिक आणि जीवनाशी निगडित अर्थ स्पष्ट करणे आवश्यक आहे.
- स्वामी विवेकानंद आणि महात्मा गांधी यांच्या कार्यातून हिंदू धर्म आणि कर्माचे प्रत्यक्ष उदाहरण देऊन संकल्पना अधिक प्रभावीपणे मांडता येतात.
- अध्ययनार्थ्यांना विवेकपूर्ण विचार आणि आचरण यांची जाणीव करून देणारे साहित्य तयार करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :**

या सत्रातून हिंदू धर्म हा केवळ धार्मिक आचारांचा समूह नसून, तो जीवनाला दिशा देणारी आणि कर्मप्रधान मूल्यव्यवस्था आहे, हे स्पष्ट झाले. धर्म, कर्म, तप, दान आणि सत्य यांसारख्या संकल्पनांचा आधुनिक संदर्भात पुनर्विचार करून त्यांचे सुस्पष्ट व प्रभावी सादरीकरण अध्ययन साहित्यात करणे आवश्यक असल्याचे अधोरेखित झाले. हे सत्र अध्ययन साहित्य निर्मितीसाठी अत्यंत मार्गदर्शक ठरले.

## चौथे सत्र

**सत्राचे शीर्षक:** लेखक संवाद व शिक्षणक्रमावरील अभिप्राय सत्र

**उपस्थिती:** विद्याशाखेचे संचालक व सर्व लेखक

**सत्राचा प्रकार:** संवादात्मक

**सत्राचा आढावा :**

या सत्रामध्ये लेखकांमधील परस्पर संवाद साधत शिक्षणक्रमाविषयी अभिप्राय जाणून घेण्यावर भर देण्यात आला. सत्राचे स्वरूप संवादात्मक असून, अध्ययन साहित्य निर्मिती प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, अपेक्षा आणि सुधारणा यावर मुक्त चर्चा करण्यात आली.

**मुख्य मुद्दे :**

- सर्व लेखकांचा परस्पर परिचय घडवून आणण्यात आला, ज्यामुळे समन्वय साधणे सुलभ झाले.
- अध्ययन साहित्य लेखनासाठी मार्गदर्शन करणाऱ्या संपादक व तज्ज्ञांशी संपर्क साधण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली.
- शिक्षणक्रमातील विविध घटकांमध्ये पुनरावृत्ती टाळणे तसेच कोणताही मुद्दा राहून जाऊ नये, यासाठी समन्वित दृष्टिकोन आवश्यक असल्याचे अधोरेखित झाले.
- यासाठी समग्र शिक्षणक्रम आराखडा (Curriculum Framework) सर्व लेखकांना उपलब्ध करून देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.
- प्रत्येक लेखकाला सोपविण्यात आलेल्या घटकांचा आणि त्यांच्या मूळ अभ्यास विषयांचा परिचय सर्वांसमोर मांडण्यात आला.
- लेखन प्रक्रियेत एकसंधता राखण्यासाठी संवाद आणि सहकार्याची भूमिका महत्त्वाची असल्याचे अधोरेखित झाले.

**अध्ययन साहित्य निर्मितीसाठी मार्गदर्शन :**

- लेखन करताना समन्वय आणि सातत्य राखणे आवश्यक आहे.
- सर्व घटकांचा परस्परसंबंध लक्षात घेऊन एकात्मिक दृष्टिकोनातून लेखन करावे.
- पुनरावृत्ती टाळण्यासाठी आणि विषयाची पूर्णता साधण्यासाठीपूर्वनियोजित आराखड्याचा वापर करावा.
- तज्ज्ञ व संपादकांच्या मार्गदर्शनाखाली लेखन केल्यास गुणवत्ता आणि सुसंगतता वाढते.

**निष्कर्ष :**

या सत्रातून अध्ययन साहित्य निर्मिती ही केवळ वैयक्तिक प्रक्रिया नसून, ती सामूहिक व समन्वित प्रयत्नांची फलश्रुती आहे, हे स्पष्ट झाले. लेखकांमधील संवाद, समन्वय आणि तज्ज्ञ मार्गदर्शन यांच्या साहाय्याने अधिक गुणवत्तापूर्ण व एकसंध अध्ययन साहित्य तयार करता येईल, हा विश्वास या सत्रातून दृढ झाला.

## समारोप सत्र अहवाल

**सत्राचे शीर्षक :** समारोप सत्र व मनोगत

**मनोगत सादर :** डॉ. विनया क्षीरसागर (पुणे), सुमित कठाळे (क. का. सं. वि., रामटेक, नागपूर)

**सत्राचा आढावा :**

द्विदिवसीय कार्यशाळेच्या समारोप सत्रात सहभागी तज्ञांनी कार्यशाळेदरम्यान प्राप्त ज्ञान, अनुभव आणि मार्गदर्शनाविषयी मनोगत व्यक्त केले. या सत्रातून संपूर्ण कार्यशाळेचा आढावा घेत, अध्ययन साहित्य निर्मितीच्या प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण पैलू अधोरेखित करण्यात आले.

**मुख्य मुद्दे :**

- डॉ. विनया क्षीरसागर आणि सुमित कठाळे यांनी कार्यशाळेमुळे अध्ययन साहित्य लेखनाची विद्यापीठीन पद्धत (format) स्पष्टपणे समजल्याचे सांगितले.
- विषयाचे ज्ञान असले तरी, त्याचे संरचित व शैक्षणिक प्रारूपात मांडणी कशी करावी, याविषयी या कार्यशाळेतून मार्गदर्शन मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.
- तज्ञांच्या सहवासामुळे लेखनातील सूक्ष्मता, संदर्भांचा वापर आणि सुसंगत मांडणी अधिक स्पष्ट झाली.
- प्रत्येक सत्रात चर्चेसाठी दिलेल्या वेळेमुळे विषयाचा सखोल विस्तार आणि स्पष्टता साध्य झाली.

**मार्गदर्शनपर सूचना :**

- डॉ. बिसेन सर यांनी लेखकांना अध्ययन साहित्य तयार करताना पुरेसा वेळ घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले, ज्यामुळे अधिक अभ्यासपूर्ण व गुणवत्तापूर्ण साहित्य निर्माण होईल
- त्याचबरोबर, ज्यांनी आपले लेखन वेळेत सादर केले आहे, त्यांना विलंबामुळे त्रास होणार नाही, याचाही समतोल राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.
- लेखन प्रक्रियेत गुणवत्ता आणि वेळेचे व्यवस्थापन यांचा समन्वय साधणे आवश्यक असल्यावर भर देण्यात आला.

**निष्कर्ष :**

